Publication: lokmat
Date: 9/2/2019
Page: 3
Column: 1

लोकमत मुंबई, शनिवार, दि. ९ फेब्रुवारी २०१९

## रस्ता सुरक्षा सप्ताह

मुंबई : आरटीओ अधिकाऱ्यांसोबत अदानी इलेक्ट्रिसिटी ३०वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करत आहे. सप्ताहादरम्यान आरटीओ अधिकारी आणि अदानीचे एकूण सात हजारांहून अधिक अधिकारी, कर्मचारी रस्ता सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण करत आहेत. यासाठी सार्वजनिक ठिकाणी एक अपघातग्रस्त वाहन ठेवण्यात आले आहे. याद्वारे अपघातांबाबत जागरुकता निर्माण केली जात आहे. वाहन चालविताना कोणती खबरदारी घेतली पाहिजे, याबाबत माहिती दिली जात आहे. सिक्युरिटी टीममधील सदस्य, माजी पोलीस अधिकारी व माजी सैन्य अधिकारी यांनी यात सहभाग घेत सुरक्षेप्रती जागरुकता निर्माण केली आहे. दरम्यान, दरवर्षी भारतात रस्ते अपघातांमुळे जवळपास ऐंशी हजार लोकांचा मृत्यू होतो. जगामध्ये अशा दुर्घटनांचे प्रमाण १३ टक्के आहे.